# महत्त्वाचे

## सुरेशनगरच्या उपसरपंचपदी सुवर्णा क्षीरसागर बिनविरोध



**नेवासाफाटा (वार्ताहर)**–नेवासा तालुक्यातील सुरेशनगरच्या उपसरपंचपदी सुवर्णा सतीश क्षीरसागर यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. रोटेशनपद्धतीने उपसरपंच मैनाबाई नाथा बाबर यांचा कार्यकाळ संपल्यामुळे उपसरपंचपदी सुवर्णा क्षीरसागर यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीनंतर सुवर्णा क्षीरसागर यांचा सुरेशनगर गावच्या सरपंच शैला भेदळ यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सुरेशनगरच्या विकासासाठी आम्ही सर्वजण हातात हात घालून काम करू अशी ग्वाही निवडीनंतर सुवर्णा क्षीरसागर यांनी दिली. याप्रसंगी ग्रामपंचायतचे मार्गदर्शक कल्याणराव उभेदळ, सदस्य विठ्ठल पाषाण, भागचंद पाडळे, नाथा बाबर, मैनाबाई बाबर, जिजाबा उभेदळ, नानासाहेब क्षीरसागर, बापूसाहेब उभेदळ, साहेबा सावंत, विजय उभेदळ, हर्षद पाटील, बबनराव शेटे, दिलीप शेटे, आण्णाभाऊ क्षीरसागर, मनिषा विधाटे, सोनाली अकोलकर, अक्षय शिंदे, ग्रामविकास अधिकारी राजेंद्र जाधव, कर्मचारी अविनाश उभेदळ यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

## वडगावपान येथील शाळेत प्रवेशोत्सव साजरा



**संगमनेर (प्रतिनिधी)** – तालुक्यातील वडगावपान येथील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेत शाळा प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी शाळेत प्रवेश घेतलेल्या नवीन मुलांची पारंपरिक वाद्यांच्या आवाजात सजावट केलेल्या ट्रॅक्टर ट्रॉलीमध्ये मिरवणूक काढण्यात आली. पुष्पगुच्छ देऊन नवागतांचे स्वागत करण्यात आले. तसेच मोफत गणवेश, बुट, पुस्तके यांचे उपस्थितांच्या हस्ते वाटप करण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांना गोड जेवण देण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच श्रीनाथ थोरात, प्रमुख पाहुणे केंद्रप्रमुख आशा घुले, तसेच उपसरपंच सोमनाथ गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य गणेश गडगे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गणेश थोरात, उपाध्यक्ष भारती काशिद, शाळा व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, पालक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सदस्य संदीप थोरात, अमित गडगे, कैलास गडगे, अंजली दिघे, रावसाहेब थोरात, सौ. लांडे, दीपक आव्हाड तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, मुख्याध्यापक श्रीमती. वाकचौरे, शिक्षक भागवत, सौ. राऊत, सौ. सातपुते आदींनी परिश्रम घेतले.

## भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा सचिवपदी कॉ. सातपुते



**नेवासा (तालुका प्रतिनिधी)**– तालुक्यातील नजीक चिंचोली येथील कॉ.बन्सी सातपुते यांची भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या जिल्हा सचिवपदी निवड झाली आहे. अहिल्यानगर येथे भाकपचे जिल्हा त्रैवार्षिक अधिवेशन पार पडले. या अधिवेशनात पुढील तीन वर्षासाठी जिल्हा कार्यकारिणी निवडण्यात आली. यामध्ये जिल्हा सचिवपदी कॉ.ॲड.बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिवपदी कॉ.ॲड.सुधीर टोकेकर व कॉ.संतोष खोडदे यांची निवड झाली. तर कार्यकारिणी सदस्यपदी ॲड. कॉ. सुभाष लांडे, स्मिता पानसरे, भगवान गायकवाड, कॉ.बाबा अरगडे, लक्ष्मण नवले, निवृत्ती दातीर, प्रताप सहाने, सुरेश पानसरे, कानिफनाथ तांबे, सुनील दुधाडे, भारत आरगडे, भारती न्यालपेल्ली, संदीप इथापे, बबन पाटील सालके, आप्पासाहेब वाबळे यांची निवड करण्यात आली आहे. भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे राज्य सहसचिव कॉ. डॉ. राम बाहेती यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये व राज्य सचिव कॉ. ॲड. सुभाष लांडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या त्रैवार्षिक जिल्हा अधिवेशनात शेतकरी, शेतमजूर, श्रमिक-कामगार, अल्पसंख्यांक व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या न्याय हक्कासाठी संघर्ष करण्याचा ठराव घेण्यात आला. महिला फेडरेशनच्या कॉ. स्मिता पानसरे, आप्पासाहेब वाबळे, कॉ. बाबा आरगडे, कॉ. बबनराव सालके, जिल्हा सचिव कॉ. ॲड. बन्सी सातपुते, जिल्हा सहसचिव कॉ. ॲड. सुधीर टोकेकर, कॉ. संतोष खोडदे, कॉ. भारती न्यालपेल्ली, ज्ञानेश्वर सहाणे, कॉ. महेबुब सय्यद, कॉ. अनंत लोखंडे, अशोक सब्बन, कॉ. कारभारी उगले, कॉ. भगवान गायकवाड, ॲड, ज्ञानदेव सहाणे, कॉ. सुभाष ठुबे, कॉ. सुरेश पानसरे, कॉ. बापूराव राशिनकर, लक्ष्मण नवले, कॉ. सतिश पवार, कॉ. मारुती सावंत, कॉ. कन्हैय्या बुंदेले आदींसह प्रत्येक तालुक्यातून प्रतिनीधी सहभागी झाले होते.

## चोळकेवाडी विद्यालयात शैक्षणिक साहित्याचे वाटप



**राहाता (तालुका प्रतिनिधी)**– ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने चोळकेवाडी विद्यालयात विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. या विद्यालयात नवीन प्रवेशार्थी विद्यार्थ्यांचे गुलाब पुष्प देऊन स्वागत करण्यात आले, सेवक वृंदाने स्ववर्गणीतून घेतलेल्या स्कूल बॅग तसेच साईचरित्र पारायण मित्र मंडळातर्फे विद्यार्थ्यांना वही वाटप करण्यात आले. चोळकेवाडीचे सुपुत्र सारथी एज्युकेशन, औरंगाबादचे डायरेक्टर अक्षय सुनिल चोळके यांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना शालेय ड्रेस दिला. यापूर्वीही अक्षय चोळके यांनी प्रयोग शाळा साहित्य, शालेय ड्रेस, क्रीडा साहित्य दिले आहेत. अध्यक्षस्थानी स्कूल कमिटीचे अध्यक्ष तथा गणेशचे संचालक ज्ञानदेव चोळके होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक संजय उंबरकर यांनी केले. याप्रसंगी स्थानिक व्यवस्थापन समिती अध्यक्ष भीमाशंकर चोळके, राहुल चोळके, रामदास चोळके, सोमनाथ चोळके, अनिल चोळके, अनिल दंडवते उपस्थित होते. नियोजन सांस्कृतिक विभाग प्रमुख विद्या गोरे यांनी केले, तर सूत्रसंचालन शिक्षक संजय घोरपडे यांनी केले.

# ग्रामसेवकाअभावी टाकळीभान ग्रामपंचायतीचा कारभार 'राम भरोसे'

**टाकळीभान (वार्ताहर)**– श्रीरामपूर तालुक्यातील मोठ्या लोकसंख्येच्या टाकळीभान ग्रामपंचायतीच्या ग्रामविकास आधिकाऱ्याची विद्यमान सदस्यांच्या तक्रारीमुळे राजकीय दबाव गटामुळे बदली झाली. गेले पंधरा दिवस नवीन ग्रामसेवक हजर होत नसल्याने सध्या ग्रामपंचायतीचा कारभार राम भरोसे सुरू आहे. हेलपाटे मारून ग्रामस्थ अडचणीत आले आहेत. त्यामुळे ग्रामपंचायतला ग्रामसेवक देण्यासाठी ग्रामस्थांनी याचना करण्याची वेळ आली आहे.

तालुक्यातील टाकळीभानच्या लोकसंख्येने सुमारे वीस हजाराचा टप्पा पार केला आहे. वाढत्या लोकसंख्येबरोबरच ग्रामपंचायतीकडून मिळणाऱ्या सुविधा अपुऱ्या पडत आहेत. सदस्यांमधील विसंवादामुळे समस्या वाढलेल्या आहेत. धोरणात्मक कामे आणि समस्यांचे वेळेत निराकरण होत नसल्याने ग्रामस्थ अडचणीत आहेत. त्यातच एका विद्यमान सदस्याने ग्रामसेवकाच्या कामकाजाबाबत तक्रार केल्याने आणि बदलीसाठी थेट उपोषणाचे हत्यार वापरल्याने राजकीय दबावतंत्राचा वापर करून ग्रामसेवकाची बदली केली. मात्र, नवीन ग्रामसेवक येथील चार्ज घेण्यास तयार होत नसल्याने गेल्या पंधरा दिवसांपासून ग्रामपंचायतीचा कारभार 'राम भरोसे' सुरू आहे. शैक्षणिक वर्ष सुरू असल्याने छोट्या मोठ्या कामासाठी नागरिक ग्रामपंचायत कार्यालयात खेटा मारत आहेत. मात्र, ग्रामसेवक नाहीत असे उत्तर कर्मचाऱ्यांकडून दिले जात आहे. त्यामुळे वारंवार खेटा मारून ग्रामस्थ अडचणीत आले आहेत.

मुळातच १७ सदस्य असलेल्या या ग्रामपंचायत सदस्यांमध्ये विसंवाद असल्याने धोरणात्मक कामे खोळंबून पडली आहेत. ग्रामस्थांच्या छोट्या छोट्या तक्रारींचेही निराकरण होत नाही. त्यामुळे आगोदरच ग्रामस्थ त्रस्त असतानाच विद्यमान सदस्यांच्या तक्रारीमुळे ग्रामसेवकाच्या बदलीने फोडणी मिळाली आहे. या फोडणीमुळे ग्रामस्थांना अधिकच त्रास सुरू झाला आहे. अनेक कामे खोळंबल्यामुळे आणि मुलभूत समस्या सोडवल्या जात नसल्याने ग्रामस्थांचा संताप शिगेला पोहचला आहे.

गेल्या काही वर्षांत टाकळीभानची प्रतिमा शासकीय पातळीवर काहीशी मलिन झाली आहे. गावपुढाऱ्यांच्या कामकाजातील प्रमाणापेक्षा जास्त हस्तक्षेप होत असल्याने बऱ्याचदा सरकारी कर्मचाऱ्यांना त्रास झालेला आहे. त्यामुळे कटकट नको म्हणून शासकीय कर्मचारी टाकळीभान येथे येण्यासाठी धजावत नाहीत. ग्रामसेवक, तलाठी, मुख्याध्यापक, कृषी पर्यवेक्षक, पशुधन अधिकारी, आरोग्य अधिकारी व इतरही कर्मचारी टाकळीभानमध्ये येण्यास नापसंती दाखवत असल्याने टाकळीभानची प्रतिमा मलिन होत आहे. आणि नागरिकांना मात्र त्याचा त्रास सहन करावा लागत आहे, ही वस्तुस्थिती आहे.

## बस चालकाच्या सतर्कतेमुळे अनेकांचे जीव वाचले



**राजुरी (वार्ताहर)**– बस चालकाच्या सतर्कतेमुळे अनेकांचे जीव वाचल्याची घटना श्रीरामपूर-बाभळेश्वर रोडवर राजुरी जवळ काल मंगळवारी घडली.

श्रीरामपूरकडून बस संगमनेरच्या दिशेने जात असताना बाभळेश्वरच्या दिशेने येणाऱ्या छोटा टेम्पोला वाचवण्याचा प्रयत्न करताना एसटी ड्रायव्हरने एसटी बस रोडच्या कडेला नेली. या बसमध्ये महिला, पुरुष आणि लहान मुले होती. एसटी बस चालकाच्या प्रसंगावधानाने एसटीमध्ये असणाऱ्या अनेकांचे प्राण वाचले. अनेक प्रवाशांनी या एसटी ड्रायव्हरचे आभार मानले.

बाभळेश्वरवरून श्रीरामपूरकडे जाणारा रोड चांगला असल्यामुळे छोटी मोठी वाहने भरधाव वेगात असतात. त्यामुळे या रोडवर अनेक अपघात होत आहेत. गावांमध्ये स्पीड ब्रेकर असूनही वाहने वेगाने जातात. त्यामुळे छोटे-मोठे अनेक अपघात या रोडवर पाहावयास मिळत आहेत. यात अनेकांचे जीवही गेले आहेत. श्रीरामपूर ते बाभळेश्वर रोडवर असणाऱ्या गावांमधील स्पीड ब्रेकरवर सफेद पट्टे मारावेत किंवा चमकणारे रिप्लेटर बसवावे, अशी मागणी अनेक गावातील नागरिकांकडून होत आहे.

## प्रवरा सिव्हिल अभियांत्रिकीच्या शंभर टक्के विद्यार्थ्यांना नोकरी



**राहाता (प्रतिनिधी)** – प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील प्रवरा रूरल अभियांत्रिकी महाविद्यालयातील सिव्हिल अभियांत्रिकी विभागाच्या विद्यार्थ्यांनी प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये उत्तम यश संपादन केले असून १०० टक्के विद्यार्थ्यांची विविध नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाल्याची माहिती प्राचार्य डॉ. संजय गुल्हाने यांनी दिली.

या निवडीमुळे विभागाच्या दर्जेदार शिक्षण पद्धतीसह प्लेसमेंटबाबत केलेल्या प्रयत्नांना अधिक बळ मिळाले आहे. इंडोव्हान्स प्रायव्हेट लिमिटेड पुणे, सोपान ओ अँड एम कंपनी प्रायव्हेट लिमिटेड पुणे, के रहेजा कॉर्प पुणे, केआरएम कन्स्ट्रक्शन अहिल्यानगर, लक्ष्मी सिव्हिल इंजिनिअरिंग सर्व्हिसेस कोल्हापूर, ड्रिव्हन स्टील इंजिनिअरिंग प्रायव्हेट लिमिटेड नाशिक, स्पेक्ट्रम इन्फ्रास्ट्रक्चर नाशिक, एस.आर. प्रोजेक्ट्स पुणे, बजाज फायनान्स श्रीरामपूर. या सर्व कंपन्यांमध्ये विद्यार्थ्यांना बांधकाम व्यवस्थापन, प्रकल्प योजना, रचनातंत्र, डिजाईन, फील्ड सुपरविजन आणि शासकीय क्षेत्रात नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. नोमान पटेल यांची सोपान ओ अँड एम कंपनी, पुणे तर रितेश गवळी यांची इंडोव्हान्स प्रायव्हेट लिमिटेड, पुणे येथे ४ लाख वार्षिक पगारासह निवड झाली आहे. यासाठी विद्यार्थ्यांना विभागप्रमुख डॉ. प्रमोद कोळसे, प्रशिक्षण व प्लेसमेंट अधिकारी डॉ. अण्णासाहेब वराडे, प्रा. लक्ष्मण लहामगे यांचे मार्गदर्शन लाभले.

> प्रवरा रूरल अभियांत्रिकी महाविद्यालयामधील माझा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आणि घडवणारा ठरला. ना. राधाकृष्ण विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील यांचे मिळणारे पाठबळ महत्त्वपूर्ण ठरले. सिव्हिल अभियांत्रिकी विभागामध्ये मला केवळ पुस्तकी ज्ञानच नव्हे, तर प्रत्यक्ष क्षेत्रातील कौशल्य, सॉफ्टवेअर ट्रेनिंग, इंडस्ट्री एक्स्पोजर आणि करिअर गाइडन्स मिळाले. सोपान ओ अँड एम कंपनीसारख्या नामांकित कंपनीमध्ये निवड होणे ही माझ्यासाठी एक मोठी संधी आहे.
>
> – **नोमान पटेल**

प्राचार्य डॉ. संजय गुल्हाणे म्हणाले, विद्यार्थ्यांनी मिळवलेले हे यश आमच्या संस्थेच्या शिक्षण मूल्यांनुसार आहे. आम्ही केवळ शैक्षणिक विकासावर नव्हे, तर औद्योगिक क्षमतांवरही भर देतो. या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष ना. राधाकृष्ण विखे पाटील, अण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील, डॉ. विखे पाटील कारखान्याचे अध्यक्ष डॉ. सुजय विखे पाटील, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे पाटील, सहसचिव भारत घोगरे पाटील तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. शिवानंद हिरेमठ, प्लेसमेंटचे प्रमुख मनोज परजणे यांनी अभिनंदन केले आहे.

## उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून पती-पत्नीस मारहाण

**गणेशवाडी (वार्ताहर)**– उसने दिलेले पैसे परत मागितल्याच्या कारणावरून पती-पत्नीस मारहाण करण्यात आली. ही घटना नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे घडली.

दि. १७ रोजी सायंकाळी फिर्यादी या आपल्या पतीसह जुना शिंगवे तुकाई रोडवरील त्यांच्या शेतात बांधाच्या कडेला उभ्या होत्या. त्या ठिकाणी आरोपी आबासाहेब शंकर लोखंडे, शैलेश बाळासाहेब लोखंडे, विशाल बाळासाहेब लोखंडे, बाळासाहेब शंकर लोखंडे, वैभव आबासाहेब लोखंडे (सर्व रा. घोडेगाव) यांना त्या ठिकाणी उसने घेतलेले पैसे मागितले. त्याचा राग संबंधितांना आल्याने त्यांनी पती यांना शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. सायंकाळी साडेसात वाजता पुन्हा फिर्यादी यांच्या घराजवळ येऊन पुन्हा काठीने पतीस मारहाण करु लागले. तसेच माझ्या बरोबरही लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करत, माझ्या गळ्यातील चार तोळे वजनाचे मंगळसूत्र तोडून नेले. याप्रकरणी सोनई पोलीस ठाण्यात बिएनएस चे कलम ११९(१), ७४, ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) (३), १८९(२), १९१(२), १९० प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास प्रभारी सहाय्यक पोलीस निरीक्षक आशिष शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल दत्ता गावडे करत आहेत.

## जगभरातून येणारे साईभक्त हीच साईंची मोठी शक्ती- संतोष महाराज आढावणे



**शिर्डी (प्रतिनिधी)**– शिर्डी जगाला श्रद्धा आणि सबुरीचा संदेश देणाऱ्या साईंची पावनभूमी आहे. येथे आल्यावर येथील मातीचा सुगंध साईंचा आभास करतो; त्यामुळे कोट्यावधी साईभक्त येथे येऊन साई चरणी नतमस्तक होतात. हीच साईंची मोठी शक्ती आहे, असे प्रतिपादन युवाचार्य संतोष महाराज आढावणे यांनी केले.

राहाता तालुक्यातील निमगाव कोऱ्हाळे येथे शिव महापुराण कथेप्रसंगी संतोष महाराज आढावणे यांनी विविध धार्मिक उदाहरणे देत शिव महापुराणाचे महत्त्व सांगितले. त्यांनी विविध धार्मिक उदाहरणे देत शिव महापुराणाचे महत्त्व आपल्या वाणीतून सांगताना मोठ्या प्रमाणावर महिला, पुरुष आणि वयोवृद्ध उपस्थित होते.

ते म्हणाले, साईंनी वारंवार बोलावले पाहिजे, ती येण्याची संधी अनेकांना मिळत असते; असा अनेकांचा अनुभव आहे. साई चरणी डोके टेकवल्यानंतर सर्व संकटे दूर होतात, सर्व कामे मार्गी लागतात आणि केलेल्या मनोकामना पूर्ण होतात. याचा प्रत्यय अनेकांना येत असल्याने जगातून साईभक्त या ठिकाणी येतात. मी महाराष्ट्रासह देशभरात कथा केल्या आहेत. आज साईंच्या दरबारात कथा करण्याचे योग आला, हे माझे भाग्य आहे. महाभारतात अर्जुनाने भगवान कृष्णाला विचारले, भगवंत कोठे भेटतात? त्यावेळी भगवान कृष्ण म्हणाले, ज्यांची श्रद्धा असते, त्यांना मी भेटतो. तशीच साईंचा देखील महिमा आहे; त्यामुळे श्रद्धेला मोठे महत्त्व आहे. आजची तरुणाई दारू सह विविध व्यसनांच्या आहारी जाताना दिसते. त्यांनी भगवंताच्या सेवेची नशा केली तर जीवन सुधारेल. प्रभुनामाची नशा करणारे कधी पडलेले दिसणार नाही; मात्र नशेखर तुम्हाला पडलेले दिसतील. जो साई व शिवनामाचा पेला पितो, त्याचे जीवन सुधारते. त्रास देणाऱ्यांना कधी त्रास होत नाही, मात्र चांगल्या लोकांना त्रास होतो. श्रद्धा उभा चांगला असला तर सर्व संकटे दूर होतात. असे सांगितले.

उद्योजक दत्तात्रय वाळुंज, राजेंद्र कातोरे, गोरख वदक, सतीश डेंगळे, नानाभाऊ खरात यांनी शिव महापुराण कथेचे आयोजन केले आहे. याप्रसंगी विजय आसावा, साईभक्त दिनेश शर्मा, अलीभाई मन्सुरी, विकी भोसले, प्रदीप गायकर, रावसाहेब पावडे, सेंट्रल बँकेचे व्यवस्थापक प्रमोद दहिफळे, प्रतीक गंगवाल, पंडीत आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## सोनेवाडीत बिबट्याकडून गाभण कालवडीची शिकार



**सोनेवाडी (वार्ताहर)**– कोपरगाव तालुक्यातील सोनेवाडी येथे गेल्या काही दिवसांपासून बिबट्याची दहशत आहे. या बिबट्याने मध्यरात्री सुनील कारभारी बोंडखळ यांच्या गोठ्यावर हल्ला करत त्यांची गाभण कालवडीची शिकार केली. या बिबट्याच्या दहशतीने बोंडखळ वस्ती परिसरात भितीचे वातावरण पसरले आहे.

सुनील कारभारी बोंडखळ रात्री जनावरांचे काम आटोपल्यानंतर झोपी गेले. बिबट्याने गोठ्यावर रात्री हल्ला केला आणि कालवडीची शिकार केली. पहाटे सहा वाजता बोंडखळ यांच्या हे बाब लक्षात आल्यानंतर त्यांनी आजुबाजुला असलेल्या नागरिकांना बिबट्याने कालवड खाल्ली असल्याचे सांगितले.

वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी श्रीमती पगारे यांनी बिबट्याच्या हल्ल्यात ठार झालेल्या कालवडीचा पंचनामा केला. यावेळी शिवाजी जावळे, जालिंदर बोंडखळ, सुनील बोंडखळ, रावसाहेब मिंड, सोमनाथ लांडबले, मच्छिंद्र बोंडखळ, अरूण बोंडखळ, सचिन बोंडखळ, राजेंद्र बोंडखळ आदी उपस्थित होते.

बोंडखळ वस्तीवर गेल्या अनेक दिवसांपासून बिबट्याचा वापर आहे आणि वारंवार वन विभागाला या संदर्भात कल्पना दिली आहे. परिसरात बिबट्या जेरबंद करण्यासाठी पिंजरा लावला जात नाही. आता तरी वन विभागाने तातडीने या परिसरात पिंजरा लावून बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

## शिष्यवृत्तीने दिलं गेवराईच्या सागर खंडागळेच्या स्वप्नांना बळ



**नेवासा (तालुका प्रतिनिधी)**– घरची आर्थिक परिस्थिती बेताची, पण शिक्षणाची उमेद अबाधित ठेवत गेवराई (ता. नेवासा) येथील सागर पोपट खंडागळे याने भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेच्या मदतीने आपले इंजिनिअर होण्याचे स्वप्न साकार केले.

नेवासा तालुक्यातील गेवराई येथे सागरचे आई-वडील शेती करत असून शिक्षणासाठी मोठ्या शहरात जाणे त्याला अशक्यप्राय होते. मात्र, समाजकल्याण विभागाच्या अधिकाऱ्यांकडून भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेबाबत मिळालेली माहिती त्याच्या जीवनात आशेचा किरण ठरली. बारावी नंतर सीईटी परीक्षेत मिळवलेल्या चांगल्या गुणांमुळे सागरचा प्रवेश अहिल्यानगर येथील छत्रपती शिवाजी महाराज कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग मध्ये झाला. सध्या तो मेकॅनिकल इंजिनिअरिंगच्या दुसऱ्या वर्षात शिक्षण घेत आहे.

भारत सरकार शिष्यवृत्ती योजना ही केंद्र व राज्य शासनाची संयुक्त योजना आहे. या योजनेत केंद्राचा ६० टक्के तर राज्याचा ४० टक्के वाटा असतो. या योजनेद्वारे विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, शिक्षण शुल्क व इतर मान्य बाबीवरील शुल्क प्रदान केले जातात. दरमहा २५० ते ७०० रुपये या दराने निर्वाह भत्ता, जास्तीत जास्त दहा महिन्याकरिता प्रदान करण्यात येतो. तसेच जे विद्यार्थी वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहेत. त्यांच्यासाठी हा निर्वाह भत्ता दरमहा ४०० ते १३५० रुपये अशाप्रकारे दिला जातो. अभ्यासक्रमाच्या गटानुसार यामध्ये बदल होत असतो.

> शिक्षण घेण्याची जिद्द होती, पण पैशाअभावी ते अपूर्ण राहील की काय, ही भीती होती. पण भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेमुळे माझ्या वाटचालीला दिशा मिळाली.
>
> – **सागर खंडागळे**

या योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांच्या कुटुंबियाचे उत्पन्न अडीच लाख रुपयांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. तसेच विद्यार्थी महाराष्ट्राचा रहिवासी असावा आणि तो शालांत परीक्षा उत्तीर्ण होऊन उच्च शिक्षण घेत असावा. या योजनेमुळे गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणात गळती न होता, त्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध होते. या शिष्यवृत्तीमुळे माझ्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांचे जीवन बदलू शकते, असे मत सागरने व्यक्त केले.

या योजनेबाबत अधिक माहिती किंवा मार्गदर्शन हवे असल्यास अहिल्यानगर येथील समाजकल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त प्रवीण कोरंगटीवार यांनी केले आहे.